# आकाशवाणी पुणे

## प्रादेशिक वृत्त विभाग

## पुणे वृत्तांत

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक-** 05.09.2024 **वार – गुरुवार**

---

**पर्यावरण पूरक गणेशोत्सव**

लाडक्या गणरायाच्या आगमनाला दोनच दिवस शिल्लक राहिले असून सर्वत्र गणरायाच्या स्वागताची जय्यत तयारी सुरू आहे. हा गणेशोत्सव नागरिकांनी पर्यावरणपूरक पद्धतीनं साजरा करावा असं आवाहन पुणे महानगरपालिकेनं केलं आहे. सजावटीसाठी जैवविघटनशील साहित्य वापरावं POPच्या मूर्ती न वापरता शाडू मातीच्या मूर्ती खरेदी करण्यास प्राधान्य द्यावं असं महापालिकेनं म्हटलं आहे. महानगरपालिकेचा पर्यावरण विभाग आणि लिबर्टी अर्थवेअर आर्ट यांच्या सहकार्याने शाडू मातीच्या मूर्तीसाठी “मूर्ती आमची, किमंत तुमची” हा उपक्रम राबवला जात आहे. घोले रस्त्यावरील कला दालनात आज, उद्या आणि परवा सकाळी 10 ते संध्याकाळी 6 पर्यंत या पर्यावरणपूरक मूर्ती उपलब्ध करून देण्यात आल्या असल्याचं महापालिकेनं कळवलं आहे.

दरम्यान गणेशोत्सव कालावधीत गणेश मंडळांनी प्रसाद तयार करताना आणि वाटताना स्वच्छतेच्या नियमांचं काटेकोर पालन करावं; तसंच प्रसाद स्वतः तयार करून भाविकांना वितरीत करणाऱ्या गणेश मंडळांनी अन्न आणि औषध प्रशासन कार्यालयाकडे नोंदणी करावी, अशा सूचना अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे सहआयुक्त सु. ग. अन्नपुरे यांनी दिल्या आहेत.

भाविकासाठी तयार केलेला प्रसाद काचेच्या झाकणात किंवा पारदर्शक प्लास्टिकच्या आवरणात झाकून ठेवावा. भाविकांना शिळे अन्नपदार्थ सेवनास देऊ नयेत. प्रसाद हाताळणाऱ्या सर्व व्यक्तींचे कपडे स्वच्छ असावेत, त्यांनी साबणाने

हात स्वच्छ धुवूनच कामास सुरुवात करावी. संसर्गजन्य आजार असणाऱ्या व्यक्तीने प्रसाद बनविणे व हाताळण्याची कामे करू नयेत, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

**शिक्षकदिन**
माजी राष्ट्रपती डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस, आज सर्वत्र राष्ट्रीय शिक्षक दिन म्हणून साजरा केला जात आहे. पुण्यातील विविध शाळा महाविद्यालयांमध्ये या निमित्तानं आज अनेक उपक्रम आयोजित करण्यात आले होते.

**Pcmc**
पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागानं अत्याधुनिक ड्रोनच्या सहाय्याने मालमत्ता सर्वेक्षण सुरू केलं आहे. आत्तापर्यंत 2 लाख 54 हजार नवीन मालमत्ता आढळल्या आहेत.  सध्याच्या आणि सर्वेक्षणात आढळलेल्या नवीन मालमत्ता अशा सुमारे पावणेनऊ लाख मालमत्ता नोंदणीकृत होणार आहेत. यातून महापालिकेला मोठ्या प्रमाणात महसूल मिळणार असल्याची माहिती कर संकलन विभागाचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांनी दिली.

**प्लेटलेट**
पुण्यात डेंग्यूचा तसंच अन्य साथ रोगांचा संसर्ग वाढला असून, रुग्णसंख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे रक्ताच्या पिशव्यांसह रक्तबिंबिकांची  म्हणजे प्लेटलेटची मागणी वाढली आहे.

**चिकुन गुनिया**
पुण्यात चिकुनगुन्याचा संसर्गही वाढू लागला असून, ऑगस्टमध्ये या आजारचे 52 रुग्ण आढळून आले आहेत. त्यामुळे डासांची पैदास रोखण्यासाठी आवश्यक

उपाययोजना कराव्यात तसंच आजारी व्यक्तीला डास चावू नये, याकरता काळजी घ्यावी, असं आवाहन पुणे महापालिकेचे सहायक आरोग्य अधिकारी डॉ. राजेश दिघे यांनी केलं आहे.

**रोहित पवार**

राज्यातल्या अनेक जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा तडाखा बसला असून शेतीचं मोठं नुकसान झालं आहे. या नुकसानाचे त्वरित पंचनामे करून राज्य शासनानं नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी काल पुण्यात पत्रकारांशी बोलताना केली. बहुतांश शेतकऱ्यांचं 110 टक्क्यांहून अधिक नुकसान झालं असून राज्य शासनाने साडेआठशे कोटी रुपयांची मदत जाहीर करावी अशी मागणी आपण करत असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**गहुंजे**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या गहुंजे इथल्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर अद्ययावत पायाभूत सोयीसुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. यामध्ये नवोदित वास्तुविशारद तसंच या क्षेत्रातील विद्यार्थ्यांनाही सहभागी करून घेतलं जाणार आहे. यासाठी महाराष्ट्र क्रिकेट संघटना; इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्चर सहकार्याने; “आर्किटेक्चर डिझाईन” ही स्पर्धा घेणार आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांना येत्या 10 ते 30 सप्टेंबर दरम्यान नोंदणी करता येईल, अशी माहिती महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष रोहित पवार यांनी नुकतीच पुण्यात पत्रकारांना दिली.

**हॉकी**

वरिष्ठ पुरुष गटासाठी चौथी हॉकी इंडिया आंतरविभागीय स्पर्धा आजपासून पुण्यात सुरू झाली. या स्पर्धेत देशभरातील दिग्गज 18 संघ सहभागी झाले असून अनेक

नामवंत खेळाडू यामध्ये सहभागी होणार आहेत. आजच्या पहिल्या सामन्यात गतउपविजेत्या रेल्वे प्रमोशन बोर्ड संघाने गुजरात संघाचा 13-0 असा धुव्वा उडवत विजयी सलामी दिली.

**क्रीडा**

पुणे जिल्हा फुटबॉल संघटनेच्या वतीने पीडीएफए द्वितीय श्रेणीच्या सुपर लीग स्पर्धा सुरू आहेत. या स्पर्धेत ओंकार काळकोटेच्या दोन गोलांच्या जोरावर बोपोडी एलएफएने संगम यंग बॉईज 'ब' संघावर 3-0 असा विजय मिळवला. दुसऱ्या सामन्यात डायनामाइट्स एफसीने व्हॅली हंटर्सचाही 3-0  अशाच फरकाने पराभव केला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज अधून मधून पावसाच्या हलक्या सारी येत आहेत. उद्याही पावसाच्या हलक्या सरी अपेक्षित आहेत. कमाल 30 अंश तर किमान 22 अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**